# प्रकरण IV

# कामगारांची नोंदणी व मजुरी प्रदाने

# प्रकरण IV

# कामगारांची नोंदणी व मजुरी प्रदाने

## 4.1 रोजगार निर्मिती

किमान 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देऊन आणि ग्रामीण भागातील गरिबांच्या उपजीविकेच्या साधनांचा पाया मजबूत करण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्यांनी संभाव्य मजुरी-शोधकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर बारीक लक्ष देणे आणि कामासाठी नोंदणी, जॉब कार्ड जारी करणे आणि कामाच्या मागणीनुसार अर्ज सादर करणे यासाठी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. देशाच्या ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांची उपजीविका सुरक्षा वाढविण्याचे उद्दिष्ट तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा ग्रामीण समाजातील असुरक्षित घटकांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल.

लेखापरीक्षणाने निवडलेले जिल्हे, तालुके आणि ग्राम पंचायतींच्या विदाचे विश्लेषण केले आणि असे निदर्शनास आले की जॉब कार्ड जारी करण्यासाठी अर्ज प्राप्त करणे, जॉब कार्डची पडताळणी आणि रोजगार नोंदवही ठेवणे यांत अंतर्भूत प्रक्रिया मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार केली गेली नाही. निष्कर्षांची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

## 4.2 कामगारांची नोंदणी

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची III च्या परिच्छेद 1 नुसार कोणत्याही ग्रामीण भागात राहणाऱ्या व अकुशल मजुरी करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ सदस्याने जॉब कार्ड जारी करण्यासाठी, आपल्या घराच्या नोंदणीकरीता नाव, वय व घराचा पत्ता ज्या ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रात राहतो त्या ग्राम पंचायतीकडे सादर करावा. घरांची नोंदणी, जॉब कार्डस देणे आणि रोजगार वाटप करण्याची प्रक्रिया खालील **आलेख 4.1** मध्ये दर्शविली आहे:

**आलेख 4.1: नोंदणी प्रक्रिया, जॉब कार्ड आणि रोजगार वाटप**

- नोंदणी करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्ति शोधण्यासाठी ग्राम पंचायतीने घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावे
- प्रौढ व्यक्ति ग्राम पंचायत कार्यालयात नोंदणीसाठी अर्ज करू शकतात
- पडताळणीनंतर, नरेगासॉफ्टमध्ये प्रत्येक कुटुंबासाठी विशिष्ट नोंदणी क्रमांक नियुक्त केला जाईल


- नोंदणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर पंधरवड्याच्या आत जॉब कार्डस जारी करणे आवश्यक आहे
- जॉब कार्डवर नोंदणीकृत सदस्यांचे छायाचित्र असणे आवश्यक
- जॉब कार्ड पाच वर्षांसाठी वैध असेल
- जॉब कार्डमध्ये कामाची मागणी केलेल्या दिवसांची संख्या, काम दिलेल्या दिवसांची संख्या आणि प्रदान मजुरी याचा तपशील असेल
- जॉब कार्ड कुटुंबाच्या ताब्यात असणे आवश्यक

- कामासाठी अर्ज तोंडी किंवा लेखी असू शकतो आणि तो प्रभाग सदस्याला किंवा ग्राम पंचायतीला किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याला दिला जाऊ शकतो
- प्रत्येक अर्जदाराला दिनांकित पावती दिली जाईल
- अर्ज केल्यापासून 15 दिवसांच्या आत रोजगार द्यावा. तसे न केल्यास बेरोजगारी भत्ता द्यावा लागेल

## 4.3 नोंदणीकृत कुटुंबे आणि नोंदणीकृत व्यक्ति

राज्यात 2019-20 ते 2023-24 या कालावधीत नोंदणी झालेल्या कुटुंबांची संख्या **आलेख 4.2** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 4.2: मागील वर्षांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्ति आणि कुटुंबे व जारी केलेली जॉब कार्डस**




*स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाउनलोड केलेल्या (सप्टेंबर 2025) विदाच्या आधारे संकलित*

2019-20 ते 2023-24 या कालावधीत या योजनेंतर्गत राज्यात नोंदणीकृत कुटुंबांच्या संख्येत 46 टक्के वाढ झाली असून निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये ही वाढ 33 टक्के होती. मार्च 2024 पर्यंत नोंदणीकृत 136.82 लाख कुटुंबांच्या तुलनेत 121.09 लाख कुटुंबांना (89 टक्के) जॉब कार्डस जारी करण्यात आली (सप्टेंबर 2025).

## 4.4 घरोघरी जाऊन सर्वेक्षण

मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 3.1.1(ii) नुसार प्रत्येक ग्राम पंचायतीने नोंदणीपासून वंचित राहिलेल्या आणि नोंदणी करू इच्छिणाऱ्या पात्र कुटुंबांची ओळख पटवण्यासाठी दरवर्षी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. रोजगाराच्या शोधात किंवा इतर कारणांमुळे लोक इतर भागात स्थलांतरित झालेले नसतांना हे सर्वेक्षण केले जाईल हे सुनिश्चित करणे आवश्यक होते.

चाचणी-तपासणी केलेल्या 48 ग्राम पंचायतींनी सादर केलेल्या माहितीनुसार, 2019-20 ते 2023-24 दरम्यान 26 ग्राम पंचायतींनी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केल्याचे प्रतिपादित केले, तर 22 ग्राम पंचायतींनी (46 टक्के) घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले नसल्याचे सांगितले. मात्र, ज्या ग्राम पंचायतींनी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केल्याचे प्रतिपादित केले,

त्यांनी असे सर्वेक्षण केल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले गेले नाही असे नमूद करणाऱ्या 22 ग्रामपंचायतींपैकी 12 ग्रामपंचायतींनी सर्वेक्षण न करण्याबद्दल कोणतेही उत्तर/कारण दिले नाही. उर्वरित 10 ग्रामपंचायतींनी सर्वेक्षण न करण्याचा संबंध कोविड महामारी आणि राज्य शासन/उच्च अधिकाऱ्यांकडून आदेश न मिळाल्याशी जोडला. राज्य शासन/उच्च अधिकाऱ्यांकडून आदेश न मिळाल्यामुळे सर्वेक्षण केले गेले नाही हे उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण कार्यचालन मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रत्येक ग्राम पंचायतीने दरवर्षी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याचे विहित केले होते.

घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात अपयशी ठरल्याने कुटुंबांना या योजनेत समाविष्ट न करून घेण्याचा धोका वाढतो. शिवाय, अशा सर्वेक्षणामुळे **परिच्छेद 4.5.3** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे त्याच कुटुंबांना देण्यात आलेल्या दुबार प्रती (डुप्लिकेट) मधील जॉब कार्डस काढून टाकणे सुलभ झाले असते.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (मार्च 2025) की, दरवर्षी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याच्या सूचना जिल्ह्यांना दिल्या आहेत.

## 4.5 जॉब कार्डस

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या परिच्छेद 2 नुसार नोंदणीसाठी[1], अर्ज प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या आत कुटुंबाला जॉब कार्ड देणे हे ग्राम पंचायतीचे कर्तव्य आहे. जॉब कार्डमध्ये घरातील नोंदणीकृत प्रौढ सदस्यांचा तपशील, त्यांची छायाचित्रे, बँक किंवा पोस्ट ऑफिस खाते क्रमांकासह विशिष्ट जॉब कार्ड क्रमांक, आधार क्रमांक वगैरे असेल.

### 4.5.1 अर्ज नोंदवही ठेवणे

कार्यचालन सूचनांच्या परिच्छेद 10.3.5 नुसार ग्राम पंचायतीने अर्ज नोंदवही ठेवणे आवश्यक होते ज्यामध्ये अर्ज प्राप्त होण्याची तारीख, जारी करण्यात आलेल्या जॉब कार्डसचा तपशील इत्यादि दर्शविलेले असेल. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारने देखील सर्व ग्राम पंचायतींना अर्ज नोंदवहीची सक्ती करण्याचे निर्देश (ऑक्टोबर 2016) दिले होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 47 ग्रामपंचायतींमध्ये जॉब कार्डससाठी अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दर्शविणारी अर्ज नोंदवही ठेवण्यात आली नव्हती. अर्ज नोंदवहीच्या अभावी प्राप्त झालेले सर्व अर्ज नोंदणी करण्यात आले होते किंवा नाकारले होते याची खात्री लेखापरीक्षेला करता आली नाही.

---

[1] पडताळणीनंतर पात्र ठरल्यास घराचे सर्व तपशील, नरेगासॉफ्ट मध्ये प्रविष्ट केले आहेत आणि विशिष्ट नोंदणी क्रमांक देण्यात आला आहे.


47 ग्रामपंचायतींपैकी 29 ग्रामपंचायतींनी कोणतेही उत्तर दिले नाही. उर्वरित 18 ग्रामपंचायतींपैकी, सहा ग्रामपंचायतींनी नमूद केले की अर्ज नोंदवही ऑनलाइन ठेवली गेली, एका ग्राम पंचायतीने नमूद केले की प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे नोंदवही ठेवली गेली नाही तर 11 ग्रामपंचायतींनी नोंदवही न ठेवण्याची कारणे नमूद न करता नोंदवही अद्ययावत केली जाईल असे सांगितले.

आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) उत्तरादाखल नमूद केले (जून 2025) की, सर्व ग्राम पंचायतींना तातडीने अर्ज नोंदवही ठेवण्याचे निर्देश दिले गेले आहेत.

### 4.5.2 जॉब कार्डस जारी करण्यातील विलंब

अर्ज मिळाल्यानंतर 15 दिवसांच्या आत लाभार्थ्यांना जॉब कार्ड द्यावयाचे होते. निवडलेल्या 48 ग्रामपंचायतींमध्ये नोंदणीसाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या संदर्भात ऑनलाइन विदाची छाननी केली असता 2019-20 ते 2023-24 दरम्यान झालेल्या 15,077 नोंदणींपैकी **आलेख 4.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 7,771 जॉब कार्डस (52 टक्के) जारी करण्यास विलंब झाल्याचे निदर्शनास आले.

**आलेख 4.3: निवडलेल्या ग्राम पंचायतींमध्ये जॉब कार्डस जारी करण्यात झालेला विलंब**




*स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाउनलोड केलेल्या (जानेवारी 2025) विदाच्या आधारे संकलित*

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 7,771 जॉब कार्डस जारी करण्यास एक दिवस ते 1,697 दिवसांच्या दरम्यान विलंब झाला, त्यापैकी 2,184[2] जॉब कार्डस (28 टक्के) एका वर्षापेक्षा जास्त विलंबानंतर जारी करण्यात आली होती, तर जानेवारी 2025 पर्यंत 1,349 नोंदणीकृत अर्जांना जॉब कार्डस जारी करण्यात आली नव्हती.

---

2 एक वर्ष ते दोन वर्षे विलंब :1619 + दोन वर्षांहून अधिक विलंब :565

निर्गमन बैठकीत, आयुक्त (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (मे 2025) की मार्गदर्शक सूचनांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना सूचना दिल्या जातील.

उत्तरात, आयुक्त (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (मे 2025) की कामगार जॉब कार्डसची मागणी करत नाहीत. उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण नोंदणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या आत जॉब कार्डस जारी करणे हे ग्रामपंचायतींचे कर्तव्य असल्याने कामगारांना जॉब कार्ड देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करायला हवे होते.

जॉब कार्डस मिळण्यास विलंब झाल्यामुळे आणि जॉब कार्डस जारी न झाल्यामुळे लाभार्थी रोजगारापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

### 4.5.3 दुबार जॉब कार्डस

नरेगासॉफ्ट एक अहवाल तयार करते ज्यामध्ये वेगवेगळे अनुक्रमांक असलेले परंतु घरच्या प्रमुखाचे एकच नाव असलेली जॉब कार्डस दर्शविलेली असतात. अहवालानुसार (नोव्हेंबर 2024) राज्यात नोंदणीकृत 4.99 लाख जॉब कार्डसमध्ये त्या कुटुंबाच्या प्रमुखाचे नाव होते ज्यावर जॉब कार्ड आधीच नोंदणीकृत होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की निवडलेल्या 48 ग्रामपंचायतींपैकी 44[3] मध्ये 577 जॉब कार्डांवर कुटुंबातील प्रमुखाचे नाव होते ज्याच्या नावे एक किंवा अधिक जॉब कार्डसची नोंदणी करण्यात आली होती. या 577[4] जॉब कार्डसच्या तुलनेत 595 अतिरिक्त जॉब कार्डसची नोंदणी करण्यात आली. या 595 अतिरिक्त कार्डसच्या छाननीत असे निदर्शनास आले की 213 जॉब कार्डसची नोंदणी पाच ते 13 वर्षांपूर्वी (ऑक्टोबर 2024 पर्यंत) झाली होती, तर 382 जॉब कार्डसची नोंदणी तीन ते पाच वर्षांपूर्वी (ऑक्टोबर 2024 पर्यंत) झाली होती.

नोंदणीकृत अतिरिक्त जॉब कार्डसचा विदा पुष्टीकरणासाठी 40 ग्राम पंचायतींना देण्यात आला. 29 ग्राम पंचायतींनी प्रतिसाद दिला आणि पुष्टी केली की जारी केलेल्या 319 अतिरिक्त कार्डसपैकी 317 कार्डस दुबार होती (दोन ग्राम पंचायतींनी जारी केलेल्या दोन अतिरिक्त कार्डसमध्ये, जरी नावे समान होती तरी व्यक्ती भिन्न होत्या).

नरेगासॉफ्टकडे आधार क्रमांक सारख्या विशिष्ट अभिज्ञापकांशी नोंदणीची जोडणी(लिंक) करून कुटुंबातील प्रमुखाच्या समान नावाच्या जॉब कार्डसची नोंदणी रोखण्यासाठी तपासणी यंत्रणा नव्हती. जॉबकार्डच्या दुबार नोंदणीमुळे तालुक्याद्वारे जॉब कार्डसच्या नोंदणीमध्ये अपुरे अंतर्गत नियंत्रण दिसून आले.

---

[3] मांडवी ग्रामपंचायत (कल्लमेश्वर तालुका) मधील आगरा, मोहगाव भदादे आणि नागपूर जिल्ह्यातील थातुरवाडा ग्रामपंचायत(नारखेड तालुका) येथे दुबार जॉब कार्डस दिली नव्हती

[4] 561 कुटुंबांना दुप्पट जॉब कार्डस दिली होती तर 14 कुटुंबांना तिप्पट जॉब कार्डस दिली होती, दोन कुटुंबांना चौपट जॉब कार्डस दिली होती॰

दुबार कार्डच्या नोंदणीचा परिणाम म्हणजे दोन्ही कार्डसना एकत्रितपणे एका वर्षात 100 दिवसांपेक्षा जास्त रोजगार मिळाला. एका वर्षात 100 दिवसांपेक्षा जास्त रोजगाराचे वाटप (2019-20 ते 2023-24 या कालावधीत 36 कामगारांना 2,744 दिवस) 19 कुटुंबांच्या बाबतीत आढळून आले, परिणामी, प्रत्येक कुटुंबाला 100 दिवसांपेक्षा जास्त मजुरी राज्य शासनाद्वारे भरावे लागणार असल्याने केंद्र सरकारच्या निधीतून ₹ 6.53 लाख अनियमित मजुरी देण्यात आली.

आयुक्त (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) यांनी उत्तरादाखल नमूद केले (जून 2025) की दुबार कार्डच्या मुद्द्याची चौकशी केली जात आहे आणि विदासंचामध्ये आवश्यक दुरुस्त्या केल्या जातील आणि अशा घटना टाळण्यासाठी मार्गदर्शक तत्वांची कडक अंमलबजावणी केली जात आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, दुबार जॉब कार्ड टाळण्यासाठी पडताळणी व दुरुस्ती मोहीम हाती घेण्याबाबत जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना सूचना जारी करण्यात येत आहेत.

### 4.5.4 जॉब कार्डसमधील कमतरता

ग्रामपंचायतींना जॉब कार्ड हे किती दिवस कामाची मागणी करण्यात आली, किती दिवस काम देण्यात आले, बेरोजगारी भत्ता दिला अथवा कसे, अदा केलेली मजुरी याबाबींसह नियमितपणे अद्ययावत करावे लागते. जारी केलेले जॉब कार्ड हे किमान पाच वर्षांसाठी वैध असेल, त्यानंतर ग्राम पंचायतीद्वारे योग्य पडताळणी नंतर जॉब कार्डचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

लाभार्थी सर्वेक्षणादरम्यान, 480 पैकी 419 लाभार्थ्यांनी लेखापरीक्षण तपासणीकरीता जॉबकार्डस सादर केली. तपासणीत खालील बाबी निदर्शनास आल्या.

***i) जॉब कार्डसमधील छायाचित्र ओळख*:** 49 (12 टक्के) जॉब कार्डसवर नोंदणीकृत सदस्यांचे फोटो लावण्यात आले नव्हते.

***ii) जॉब कार्डसमधील तपशील*:** 157 (37 टक्के) जॉब कार्डसमध्ये किती दिवसांच्या कामाची मागणी करण्यात आली, किती दिवसांसाठी काम देण्यात आले, किती मजुरी अदा केली याचा तपशील नोंदविण्यात आला नव्हता.

***iii) जॉब कार्डसवर स्वाक्षरी*:** लाभार्थ्यांना जारी करण्यात येणाऱ्या जॉब कार्डसवर कुटुंबप्रमुख आणि कार्यक्रम अधिकारी (गट विकास अधिकारी) यांची स्वाक्षरी असणे आवश्यक होते. लेखापरीक्षण तपासणीत 176 जॉब कार्डवर (42 टक्के) कुटुंबप्रमुख किंवा कार्यक्रम अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आले.

### 4.5.5 जॉब कार्डसची पडताळणी

नरेगासॉफ्टच्या जानेवारी 2025 च्या छाननीत असे निदर्शनास आले की, निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींमध्ये फेब्रुवारी 2006 ते मार्च 2019 दरम्यान जारी करण्यात आलेल्या 23,270 जॉब कार्डसपैकी 1,419 जॉब कार्डसची जानेवारी 2025 पर्यंत ग्राम पंचायतींनी

एकदाही पडताळणी केली नाही. तसेच, जुलै 2011 ते मार्च 2019 दरम्यान 21,692 जॉबकार्डसची (23,270 जॉब कार्डस पैकी) आधी पडताळणी झाली होती आणि ती पुन:पडताळणीसाठी नियत होती, तरी जानेवारी 2025 पर्यंत त्यांची पडताळणी झाली नव्हती. त्यामुळे, 23,270 जॉबकार्डसपैकी 23,211 जॉबकार्डस (99 टक्के) पडताळणीसाठी पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (मे 2025) की जॉब कार्डसची योग्य देखभाल व त्यांची पडताळणी करण्यासाठी निर्देश दिले जातील.

## 4.6 कामाची मागणी

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या परिच्छेद 6 नुसार, नोंदणीकृत कुटुंबातील प्रत्येक प्रौढ सदस्य ज्याचे नाव जॉब कार्डवर आहे तो या योजनेअंतर्गत अकुशल अंगमेहनतीच्या कामासाठी अर्ज करण्यास पात्र असेल; आणि अशा प्रत्येक अर्जाची अनिवार्यपणे नोंदणी केली जाईल आणि तारखेसह पावती जारी केली जाईल, जी संगणक प्रणालीत प्रविष्ट केली जाईल. कामाची मागणी, तोंडी किंवा लेखी कोणत्याही जॉबकार्डधारकाच्या आवश्यकतेनुसार नोंदविली जाईल.

### 4.6.1 रोजगार नोंदवहीची देखभाल

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यचालन सूचनांच्या परिच्छेद 3.4 (ii) नुसार, विनंती केलेल्या कामाची आणि वाटप केलेल्या कामाची माहिती जॉब कार्ड आणि रोजगार नोंदवहीमध्ये नमूद करणे आवश्यक आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारने देखील निर्देश दिले (ऑक्टोबर 2016) होते की जॉब कार्ड-निहाय कामाच्या मागणीची तारीख, कामाची मागणी केलेल्या दिवसांची संख्या, काम केलेल्या दिवसांची संख्या, मजूरी प्रदानाची तारीख, प्रदान मजूरी, प्रदान केलेला बेरोजगारी भत्ता, प्रदान केलेली विलंब भरपाई इत्यादी दर्शविणारी नोंदवही (नोंदवही-III) ग्राम पंचायतींमध्ये हस्तलिखित/मानवी (मॅन्युअली) ठेवावी.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निवडलेल्या 48 पैकी 15[5] ग्रामपंचायतींमध्ये रोजगार नोंदवही हस्तलिखित स्वरुपात ठेवली जात नव्हती, तर तीन[6] ग्रामपंचायतींमध्ये ती ठेवली जात असूनही अद्ययावत केली जात नव्हती. तसेच, मजुरांकडून प्राप्त कामाच्या अर्जासंदर्भात दिलेली पावती (तारखेसह) नरेगासॉफ्टमध्ये प्रविष्ट करण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (जून 2025) केले की, सर्व ग्राम पंचायतींना रोजगार नोंदवही हस्तलिखित स्वरुपात ठेवण्याचे व नियमितपणे अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

[5] छत्रपती संभाजीनगर: आठ ग्राम पंचायती, अमरावती: सात ग्राम पंचायती

[6] अहिल्यानगर: बालमटाकळी, सामनगाव, ठाकूर निमगाव

### 4.6.2 कामाची मागणी करणारी कुटुंबे आणि कामाचे वाटप

नोंदणीकृत कुटुंबांची संख्या, नोंदणीकृत कुटुंबांनी मागणी केलेले काम, रोजगार दिलेल्या कुटुंबांची संख्या, रोजगार न दिलेल्या कुटुंबांची संख्या आणि 100 दिवसांचे काम पूर्ण करणाऱ्या कुटुंबांची संख्या **तक्ता 4.1** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.1 : राज्यात 2019-20 ते 2023-24 या कालावधीत केलेली मागणी आणि न दिलेला रोजगार**


| वर्ष | नोंदणीकृत कुटुंबांची संख्या | रोजगाराची मागणी करणाऱ्या कुटुंबांची संख्या (टक्केवारी) | रोजगार दिलेल्या कुटुंबांची संख्या | रोजगार न दिलेल्या कुटुंबांची संख्या | रोजगार घेतलेल्या कुटुंबांची संख्या | 100 दिवस पूर्ण केलेल्या कुटुंबांची संख्या (रोजगार प्राप्त केलेल्या कुटुंबांच्या तुलनेत टक्केवारी) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | टक्केवारी (7/6*100) |
| | (लाखात) | | | संख्या | (लाखात) | | |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** |
| **2019-20** | 93.53 | 17.29 (18) | 17.25 (99.77) | 3,992 | 15.37 | 1.24 | 8.07 |
| **2020-21** | 103.68 | 18.84 (18) | 18.79 (99.73) | 4,702 | 16.84 | 1.37 | 8.14 |
| **2021-22** | 125.80 | 22.55 (18) | 22.50 (99.78) | 5,710 | 20.36 | 1.74 | 8.55 |
| **2022-23** | 130.05 | 23.91 (18) | 23.85 (99.75) | 6,093 | 21.21 | 1.39 | 6.55 |
| **2023-24** | 136.82 | 27.24 (20) | 27.18 (99.78) | 6,186 | 24.46 | 2.80 | 11.44 |
| **एकूण** | | **109.83** | **109.57 (99.76)** | **26,683** | | | |
| **सरासरी** | **117.98** | **21.97(19)** | **21.91(99.73)** | | **19.65** | **1.71** | **8.70** |

***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाउनलोड केलेल्या (सप्टेंबर 2025) विदाच्या आधारे संकलित***

**तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 दरम्यान कामाची मागणी करणाऱ्या कुटुंबांची संख्या 17.29 लाख (18 टक्के*)* होती आणि नोंदणीकृत कुटुंबांच्या संख्येच्या तुलनेत 2023- 24 दरम्यान ती वाढून 27.24 लाख (20 टक्के) झाली होती. 2019-20 ते 2022- 23 दरम्यान सरासरी 19 टक्के कुटुंबांनी कामाची मागणी केली. अशाप्रकारे, मोठ्या संख्येने कुटुंबे कामाची मागणी करत नव्हती. तसेच, 2019-20 ते 2023-24 दरम्यान मागणी करणाऱ्या कुटुंबांपैकी 99.76 टक्के कुटुंबांना रोजगार दिला होता.

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान कुटुंबांनी लाभ घेतलेल्या रोजगाराच्या दिवसांची सरासरी संख्या **आलेख 4.4** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 4.4: 2019-20 ते 2023-24 दरम्यान कुटुंबांनी लाभ घेतलेल्या रोजगाराच्या दिवसांची सरासरी संख्या**




*स्त्रोत: नरेगासॉफ्ट मधून डाउनलोड (सप्टेंबर 2025) केलेल्या विदाच्या आधारे संकलित*

**आलेख 4.4** नुसार, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत 14.82 लाख कुटुंबांनी (75.42 टक्के) सरासरी 50 दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या रोजगाराचा लाभ घेतला, तर 1.71 लाख कुटुंबांनी (8.70 टक्के) 100 दिवस आणि त्याहून अधिक कालावधीच्या रोजगाराचा लाभ घेतला आहे.

अशाप्रकारे, या योजनेअंतर्गत कामाची मागणी करण्यामध्ये नोंदणीकृत कुटुंबांचा सहभाग तर कमी होताच, शिवाय 100 दिवसांच्या रोजगाराच्या हमीचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांची संख्याही कमी होती.

480 जॉब कार्डधारकांच्या सर्वेक्षणादरम्यान, 273 लाभार्थ्यांनी (57 टक्के) प्रतिसाद दिला की मजुरीचा दर कमी आहे आणि त्यात वाढ करणे आवश्यक आहे.

### 4.6.3 बेरोजगारी भत्ता


महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या परिच्छेद 14 नुसार कामाची मागणी नोंदविण्याच्या तारखेपासून किंवा आगाऊ अर्ज केल्यास ज्या तारखेपासून कामाची मागणी करण्यात आली आहे, त्या तारखेपासून जे नंतर असेल त्याच्या 15 दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत मागणीनुसार काम देता न आल्यास नोंदणीकृत कुटुंबांना बेरोजगारी भत्ता देण्यात यावा. बेरोजगारी भत्त्याचे प्रदान ज्या तारखेला भत्ता देय झाला त्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत केले जावे. बेरोजगारी भत्ता पहिल्या तीस दिवसांसाठी मजुरी दराच्या एक चतुर्थांशपेक्षा कमी आणि आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीकरीता मजुरी दराच्या निम्म्यापेक्षा कमी नसेल.

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची II च्या परिच्छेद 11 (1) नुसार, जर निर्दिष्ट मुदतीत मागणीनुसार काम पुरवले जाऊ शकत नसेल तर संगणक प्रणालीद्वारे स्वयंचलितपणे गणना केल्याप्रमाणे बेरोजगारी भत्ता दिला जाईल. नरेगासॉफ्ट, जे कामाची मागणी नोंदवते, जर निर्धारित कालावधीत रोजगार दिला नाही तर बेरोजगारी भत्त्याचे आपोआप गणन करते.

**तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान 109.83 लाख कुटुंबांनी केलेल्या कामाच्या मागणीच्या तुलनेत राज्याने 109.57 लाख (99.76 टक्के) कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये 2019-20 ते 2023-24 दरम्यान कामाची मागणी करणाऱ्या 4,327[7] (0.18 टक्के) कुटुंबांना रोजगार देण्यात आला नाही.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, राज्यात 2019-20 ते 2023-24 या कालावधीत बेरोजगारी भत्ता म्हणून देय असलेल्या ₹ 34.85 लाख रकमेपैकी **आलेख 4.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे केवळ ₹ 2,268 प्रदान केले होते आणि ₹ 34.83 लाख थकीत होते.

**आलेख 4.5: राज्यात प्रदान न केलेला बेरोजगारी भत्ता**




*स्त्रोत: नरेगासॉफ्ट मधून डाउनलोड (सप्टेंबर 2025) केलेल्या विदाच्या आधारे संकलित*

निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी पाच[8] (अमरावती, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नागपूर आणि पालघर) जिल्ह्यांत 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठीचा ₹ 23.45 लाख इतका बेरोजगारी भत्ता प्रदान करण्यात आला नव्हता.

[7] अमरावती: 1,128 कुटुंबे; छत्रपती संभाजीनगर: 1,116 कुटुंबे; धाराशिव: 1,132 कुटुंबे; अहिल्यानगर: 341 कुटुंबे; नागपूर: 338 कुटुंबे; पालघर:272 कुटुंबे

[8] अहिल्यानगर जिल्ह्यात बेरोजगारी भत्ता देय नव्हता.

सप्टेंबर 2025 अखेरीस, देय बेरोजगारी भत्ता ₹ 35.55 लाख होता, ज्यात 2024-25 या कालावधीसाठी देय ₹ 0.62 लाख[9] बेरोजगारी भत्ता समाविष्ट होता.

अशाप्रकारे, महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याचे उल्लंघन होऊन लाभार्थी केवळ रोजगाराच्या हमीपासूनच नव्हे, तर बेरोजगारी भत्त्यापासूनही वंचित राहिले.

तसेच, महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याच्या 3-ई (2) नुसार बेरोजगारी भत्ता प्रदान न करणे किंवा विलंबाने देण्याच्या प्रत्येक प्रकरणाची नोंद जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने राज्य शासनाला सादर केल्या जाणाऱ्या वार्षिक अहवालात अशा प्रकारे प्रदान न करण्यामागील किंवा विलंबाने देण्यामागील कारणांसह करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निवडलेल्या सहा पैकी पाच जिल्ह्यांमधील जिल्हा कार्यक्रम समन्वयकांनी बेरोजगारी भत्ता प्रदान न करण्यामागची कारणे सांगणारा वार्षिक अहवाल राज्य शासनाला सादर केला नव्हता. यावरून असेही निदर्शनास आले की नरेगासॉफ्टमध्ये प्रतिबिंबित केल्याप्रमाणे मजुरांना बेरोजगारी भत्ता वितरित करण्यासाठी राज्य शासन/आयुक्तांकडून योग्य देखरेखीचा अभाव होता.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (जून 2025) की, मजुरांना काम देण्यात आले, पण ते कामावर हजर झाले नाहीत, त्यामुळे बेरोजगारी भत्ता देय नव्हता. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, राज्यात बेरोजगारी भत्त्याची एकही प्रकरणे नाहीत आणि नरेगासॉफ्टमध्ये प्रतिबिंबित झालेल्या रोजगार प्रलंबित असल्याच्या नोंदी क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांनी केलेल्या चुकीच्या संगणकीय नोंदींमुळे आहेत.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण (i) मजुरांना काम देण्यात आले होते परंतु ते कामावर हजर झाले नाहीत हे दर्शविण्यासाठी कोणतीही लेखापरीक्षण यंत्रणा नाही. जर तसे असेल तर नरेगासॉफ्टने देय बेरोजगारी भत्त्याची गणना करायला नको होती. (ii) नरेगासॉफ्टमधील कथित चुकीच्या नोंदी 2019-20 ते 2023-24 दरम्यानच्या आहेत, ज्यामध्ये कोणतीही दुरुस्ती नंतर करण्यात आली नव्हती यावरून त्याची सत्यता दिसून येते. (iii) नरेगासॉफ्टच्या अहवालात ₹ 2,268 इतक्या बेरोजगारी भत्त्याचे प्रदान दर्शविल्यामुळे राज्यात बेरोजगारी भत्त्याची प्रकरणे नाहीत हे उत्तर योग्य नाही.

## 4.7 योजनेंतर्गत महिलांचा सहभाग


महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याच्या अनुसूची III परिच्छेद 15 नुसार ज्या महिलांनी नोंदणी केली आहे व कामाची मागणी केली आहे अशा महिलांना अशा प्रकारे प्राधान्य देण्यात यावे की, लाभार्थ्यांपैकी किमान एक तृतीयांश लाभार्थी महिला असतील. त्यांत एकल महिला व दिव्यांगांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न केले जावे, असेही या योजनेत परिकल्पित करण्यात आले होते.

---

9 वर्ष 2024-25 साठी ₹ 0.62 लाख पैकी काहीही प्रदान केले नव्हते.

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान या योजनेंतर्गत काम करणाऱ्या महिलांची जिल्हा- निहाय टक्केवारी **आलेख 4.6** मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख 4.6: 2019-20 ते 2023-24 दरम्यान एकूण कार्यरत व्यक्तींच्या तुलनेत कार्यरत महिला कामगारांची जिल्हा-निहाय (सरासरी) टक्केवारी**




*स्रोत: नरेगासॉफ्टच्या संकेतस्थळावरुन डाउनलोड (ऑक्टोबर 2024) केलेल्या विदाच्या आधारे संकलित*

**आलेख 4.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे योजनेत सहभागी होणाऱ्या महिलांची टक्केवारी भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे 55.82 टक्के इतकी आणि बुलढाणा जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे 34.86 टक्के इतकी होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, या योजनेअंतर्गत महिलांचे रोजगारातील प्रतिनिधित्व राज्य स्तरावर आणि निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या एकूण रोजगाराच्या एक तृतीयांशपेक्षा जास्त होते. निवडलेल्या 21 ग्राम पंचायतींमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व सर्व पाच वर्षांत (2019-20 ते 2023-24) एकूण निर्माण झालेल्या रोजगाराच्या एक तृतीयांशपेक्षा जास्त होते. निवडलेल्या तीन ग्राम पंचायतींमध्ये[10] महिलांचे प्रतिनिधित्व पाचही वर्षांत (2019-20 ते 2023-24) निर्माण झालेल्या एकूण रोजगाराच्या एक तृतीयांशपेक्षा कमी होते. निवडलेल्यापैकी उर्वरित 24 ग्रामपंचायतींमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व 2019-20 ते 2023-24 या कालावधीकरता वेगवेगळ्या वर्षी शून्य टक्के ते 32.98 टक्क्यांदरम्यान होते.

उत्तरात, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद (जून 2025) केले की, महिला पुरुषांप्रमाणे काम करण्यासाठी पुढे येत नाहीत, तर

[10] हिंगणी मिर्झापूर, इटकी (जिल्हा:अमरावती), आगरा (जिल्हा:नागपूर)

माहिती, शिक्षण आणि संप्रेषणाचा अवलंब करून योजनेतील महिलांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## 4.8 दिव्यांग व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी विशेष मोहीम न राबविणे

महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याच्या अनुसूची III मधील परिच्छेद 7 नुसार, शासनाने दुर्बल घटकांच्या आवश्यकता पडताळून त्यांना काम उपलब्ध करून द्यावे. मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद 9.3.9 मध्ये असेही नमूद केले आहे की सर्व दिव्यांग व्यक्ती आणि इतर दुर्बल गटातील व्यक्ती (आदिम आदिवासी गट, भटके आदिवासी गट, विमुक्त जमाती, 65 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, एचआयव्हीबाधित व्यक्ती, अंतर्गत विस्थापित व्यक्ती, विधवा महिला इ.) ओळखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, आणि ठराविक कालावधीत प्रत्येक कुटुंबाला 100 दिवसांचे काम उपलब्ध करून द्यावे. मार्गदर्शक सुचनांनुसार, प्रत्येक राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात एक अधिकारी समन्वयक (दुर्बल गट) म्हणून नियुक्त करणे आवश्यक आहे. समन्वयक (दुर्बल गट) तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत अशा अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मासिक बैठक घेतील आणि त्यानुसार मासिक व त्रैमासिक प्रगती अहवाल जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना सादर करतील.

नरेगासॉफ्टच्या सप्टेंबर 2024 पर्यंतच्या अहवालानुसार, या योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या दिव्यांग व्यक्तींची संख्या 2019-20 मधील 1.36 लाखांवरून 2023-24 मध्ये 1.24 लाख इतकी कमी झाली. निवडलेल्या 48 ग्रामपंचायतींनी पुरविलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या दिव्यांग व्यक्तींची संख्या 2019-20 मधील 187 वरून 2023- 24 मध्ये 348 पर्यंत वाढली. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023-24 दरम्यान 27 ग्रामपंचायतींमध्ये दिव्यांग व्यक्ती आणि इतर दुर्बल गटातील व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली नव्हती. तसेच, 33 ग्रामपंचायतींमध्ये ना आढावा बैठक घेण्यात आली, ना जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना प्रगती अहवाल सादर करण्यात आले.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (मे 2025) की, दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न हाताळण्यासाठी संपूर्ण राज्यात जिल्हास्तरावर दुर्बल गटासाठी समन्वयक असे पद नाही. त्यांनी पुढे असेही नमूद केले (जून 2025) की, दिव्यांग व्यक्ती आणि इतर दुर्बल गटातील व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी विशेष मोहीमा राबविण्यात येतील.

सप्टेंबर 2025 पर्यंत, या योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या दिव्यांग व्यक्तींची संख्या 1.27 लाख होती.

## 4.9 मजुरी प्रदानासाठी दरपत्रक

महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याच्या अनुसूची II मधील परिच्छेद 16 नुसार राज्य शासन हे सुनिश्चित करेल की मजुरी ही कोणताही लिंगभेदभाव न करता, कामाच्या

गुणवत्तेवर आणि मोजमापाच्या आधारे ठरवली जाईल तसेच ती ग्रामीण दरपत्रकानुसार जे विविध प्रकारच्या कामासाठी आणि वेगवेगळ्या हंगामांसाठी वेळ आणि वेग अभ्यासानंतर निश्चित केले आहे आणि वेळोवेळी सुधारित केले आहे त्याप्रमाणे दिली जाईल. या योजनेत (महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा अनुसूची II च्या परिच्छेद 17) असे नमूद केले आहे की, महिला, वृद्ध, दिव्यांग आणि दुर्धर आजार असलेल्या लोकांसाठी स्वतंत्र दरपत्रक निश्चित केले जाईल जेणेकरून उत्पादक कार्याद्वारे त्यांचा सहभाग वाढेल. तसेच, महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची II मधील परिच्छेद 18 नुसार विविध अकुशल मजुरांच्या मजुरीचे दरपत्रक असे निश्चित केले जाईल की, आठ तास काम करणाऱ्या प्रौढ व्यक्तीला, ज्यात एक तास विश्रांतीचा समावेश आहे, निर्धारीत मजुरी दराइतकी मजुरी मिळेल.

कार्यचालन सूचनांच्या परिच्छेद 7.7.4 मध्ये असे नमूद केले आहे की दरपत्रकाच्या पद्धतशीर पुनरावलोकनासाठी मनुष्य एखाद्या विशिष्ट क्षेत्रात निर्धारीत कालावधीत किती काम करू शकतो (एक "कार्य") याचा अंदाज आवश्यक आहे. या अंदाजासाठी काळजीपूर्वक आरेखन केलेला काळ, काम आणि वेग यांचा अभ्यास आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, कार्यचालन सूचनांच्या परिच्छेद 7.7.6 मध्ये असेही नमूद केले आहे की काळ, काम आणि वेग अभ्यासाने बदलत्या स्थानिक परिस्थिती आणि लोकसंख्येच्या आरोग्य आणि पोषण स्थितीवर अवलंबून कार्यांमध्ये प्रादेशिक भिन्नतेस मुभा देणे आवश्यक आहे. विशेषत: स्त्री-पुरुष, वयोवृद्ध मजूर आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग अशा मजुरांच्या मिश्र गटाची उत्पादकता प्रतिबिंबित झाली पाहिजे.

### 4.9.1 स्वतंत्र दरपत्रक

कार्यचालन सूचनांच्या परिच्छेद 7.7.8 नुसार, सर्वसामान्य कामांसाठी स्वतंत्र दर पत्रक जिल्हा स्तरावर विकसित करावयाच होते तर जटिल कामांसाठी स्वतंत्र दर पत्रक त्याच कृषी-हवामान प्रदेशातील जिल्ह्यांच्या गटासाठी विकसित करावयाचे होते. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) संपूर्ण राज्यासाठी एकसमान दरपत्रक वापरत होते आणि प्रत्येक जिल्हा/जिल्ह्यांच्या समूहासाठी स्वतंत्र दर पत्रक तयार करण्याऐवजी मजुरीच्या दरातील पुनरावलोकनाच्या आधारे त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आली होती.

महिला, वृद्ध, दिव्यांग आणि दुर्धर आजार असलेल्या व्यक्तींसाठी स्वतंत्र दरपत्रक राज्य शासनाने तयार केले नव्हते.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (जून 2025) केले की, राष्ट्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज संस्था, हैद्राबाद यांचेमार्फत महिला, वृद्ध, दिव्यांग आणि दुर्धर आजार असलेल्या व्यक्तींसाठी दरपत्रक तयार करण्याचा प्रस्ताव राज्य शासन करीत आहे.


## 4.10 मजुरी आणि नुकसान भरपाई प्रदाने

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या कलम 3 नुसार दैनंदिन मजुरीचे वाटप साप्ताहिक तत्वावर किंवा कोणत्याही परिस्थितीत असे काम केल्याच्या तारखेनंतर पंधरवड्याच्या आत केले जाईल. तसेच महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या परिच्छेद 29 नुसार हजेरी पट बंद झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत मजुरी प्रदान न केल्यास हजेरी पट बंद झाल्याच्या सोळाव्या दिवसानंतर विलंब झाल्यास दररोज थकीत वेतनाच्या 0.05 टक्के दराने मजुरी धारकांना विलंबाची भरपाई देय आहे. नुकसानभरपाई देय झाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीनंतर नुकसान भरपाई देण्यास विलंब झाल्यास तो मजुरी देण्यास विलंब होण्याप्रमाणेच मानला जाईल.

तसेच, मजुरी देण्यातील उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने आणि विविध पदाधिकारी किंवा यंत्रणांच्या दोषारोपणाची गणना करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या परिच्छेद 29 (1) (बी) नुसार, शासन पूर्ण प्रक्रियेची विभागणी करेल, जसे कामाचे मोजमाप, हजेरी पट संगणकीकृत करणे, मजुरी याद्या तयार करणे आणि निधी हस्तांतरण आदेश अपलोड करणे यांसारखी कामे विशिष्ट कार्य पूर्ण करण्यास जबाबदार विविध पदाधिकारी किंवा यंत्रणांकडून टप्पानिहाय ठराविक कमाल वेळ मर्यादेत केली जाऊन मजुरी सुनिश्चित होऊन अदा केली जाईल. राज्य शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेत योग्य पडताळणी करून नुकसानभरपाई ही मजुरी देयकासोबतच आगाऊ देणे आणि देयकास विलंब होण्यास जबाबदार असलेल्या पदाधिकारी किंवा यंत्रणेकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करणे बंधनकारक होते.

प्रदान प्रक्रियेत सहभागी असलेल्या अभिकरणे/अधिकाऱ्यांसहित विविध टप्पे **आलेख 4.7** मध्ये दर्शविले आहेत.

**आलेख 4.7: लाभार्थ्यांना मजुरी प्रदान करण्याचा प्रक्रिया ओघ आलेख**




*स्रोत: ग्राम विकास मंत्रालयाने मजूरीचे प्रदान वेळेत होण्यासाठी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना*

**आलेख** 4.7 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, संपूर्ण प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये विभागली गेली आहे. पहिल्या टप्पा ग्राम पंचायत स्तरावर होणाऱ्या उपक्रमांनी सुरू होतो आणि निधी हस्तांतरण आदेश अपलोड करण्यासाठी दुसऱ्या स्वाक्षरीकर्त्याच्या स्वाक्षरीने समाप्त होतो. दुसऱ्या टप्प्यात गंतव्य बँका/टपाल कार्यालयाद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा होईपर्यंतच्या देयकाच्या प्रक्रियेतील सर्व बाबींचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात, निधी हस्तांतरण आदेश अपलोड करण्यापर्यंतची प्रक्रिया हजेरी पट बंद झाल्यापासून आठ दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या टप्प्याची प्रक्रिया निधी हस्तांतरण आदेश मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे.

### 4.10.1 मजुरी प्रदान करण्यातील विलंब

नरेगासॉफ्टमध्ये उपलब्ध असलेल्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवरून लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निधी हस्तांतरण आदेश अपलोड होईपर्यंत प्रणाली भरपाईची गणना करते. दुसऱ्या टप्प्यातील मजुरी मिळण्यास म्हणजेच लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मजुरी जमा होईपर्यंत विलंब झाल्यामुळे भरपाईची एकत्रित स्थिती दर्शविणारा कोणताही माहिती व्यवस्थापन प्रणाली अहवाल सार्वजनिक डोमेनवर नव्हता. त्यानंतर गट विकास अधिकारी (संयुक्त कार्यक्रम अधिकारी) प्रदान करावयाची नुकसान भरपाई मंजूर करतात किंवा नाकारतात. प्रत्येक नुकसान भरपाई नाकारण्याची कारणेही नरेगासॉफ्टमध्ये नमूद केली जातात. नाकारलेली नुकसान भरपाई मजुरांना अदा केली जात नाही.

2019-20 ते 2023-24 दरम्यान मजुरी आणि नुकसान भरपाई देण्यास झालेला विलंब **तक्ता 4.2** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 4.2 : राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मजुरी आणि नुकसान भरपाई प्रदान करण्यास झालेला विलंब**

| वर्ष | मजुरी प्रदानाशी संबंधित एकूण व्यवहार | प्रदत्त मजुरी | मजुरी प्रदानास विलंब झालेले एकूण व्यवहार (एकूण व्यवहारांची टक्केवारी) | विलंबाने प्रदान केलेल्या मजुरीची रक्कम (एकूण मजुरी प्रदानाशी टक्केवारी) | गणना केलेली भरपाई | प्रदान भरपाई |
|---|---|---|---|---|---|---|
| | (लाखांमध्ये) | (₹ कोटींमध्ये) | (लाखांमध्ये) | (₹ कोटींमध्ये) | | |
| 2019-20 | 110.45 | 1,246.91 | 2.44 (2) | 27.77 (2) | **0.09** | **0.07** |
| 2020-21 | 119.50 | 1,516.64 | 3.83(3) | 48.09(3) | **0.45** | **0.26** |
| 2021-22 | 144.02 | 1,933.09 | 8.21(6) | 102.59(5) | **2.52** | **1.24** |
| 2022-23 | 136.47 | 1,900.28 | 13.57(10) | 183.50(10) | **1.95** | **0.53** |
| 2023-24 | 204.72 | 3,007.30 | 21.05(10) | 308.03(10) | **3.27** | **0.02** |
| **एकूण** | **715.16** | **9,604.22** | **49.10(7)** | **669.98(7)** | **8.30** | **2.12** |

***स्त्रोत: नरेगासॉफ्ट संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेल्या (डिसेंबर 2024) विदाच्या आधारे संकलित***

**तक्ता 4.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान प्रदान करण्यात आलेल्या एकूण मजुरीच्या सरासरी सात टक्के मजुरी रक्कम विलंबाने देण्यात आली. विलंबाने मजुरी देण्याचं प्रमाण 2019- 20 मधील दोन टक्क्यांवरून 2023-24 मध्ये 10 टक्क्यांपर्यंत वाढले. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023-24 दरम्यान बीड जिल्ह्यात मजुरीच्या 37 टक्के रक्कम सर्वाधिक विलंबाने प्रदान करण्यात आली होती. 2021- 22 ते 2023-24 दरम्यान निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक विलंब अमरावती जिल्ह्यात झाला होता, जिथे 14 टक्के मजुरी विलंबाने दिली गेली होती, तर बुलढाणा हा राज्यातील एकमेव जिल्हा होता जिथे मजुरी प्रदान करण्यास विलंब झाला नव्हता.

लेखापरीक्षणात चाचणी-तपासणी केलेल्या 336 कामांपैकी 241 कामांमध्ये 23,583 लाभार्थ्यांना (3,917 हजेरी पटांमध्ये) मजुरी प्रदान करण्यास एक दिवस ते 857 दिवसांचा विलंब झाला होता, त्यापैकी 317 लाभार्थ्यांना प्रदान करण्यास सहा महिन्यांहून अधिक विलंब झाला होता.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद **(**मार्च/जून 2025**)** केले की, मजुरी प्रदानासाठी विलंब होण्यामागे आधार क्रमांकाचे नकाशन (मॅपिंग) न करणे, कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्यानंतर डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राचे नूतनीकरण न होणे, कर्मचाऱ्यांची कमतरता, चुकीच्या आणि निष्क्रिय/बंद खात्यामुळे व्यवहार नामंजूर होणे अशी कारणे आहेत.

कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राचे नूतनीकरण न केल्यामुळे मजुरी देण्यास होणारा विलंब हा लिंक कार्यभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांकडून आधीच्या डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राची मुदत संपण्यापूर्वी त्याचे नूतनीकरण सुनिश्चित करून टाळता येण्याजोगा होता.

**तक्ता 4.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मजुरी प्रदान करण्यास विलंब झाल्यामुळे नुकसान भरपाई देण्यात 2019-20 मधील ₹ 0.09 कोटीवरून 2023-24 मध्ये ₹ 3.27 कोटीपर्यंत वाढ झाली.

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर करण्यात आलेली व नाकारण्यात आलेली नुकसान भरपाई आणि अदा करण्यात आलेली नुकसान भरपाई **तक्ता 4.3** मध्ये दर्शविली आहे

**तक्ता 4.3: ऑक्टोबर 2024 अखेरीस मजुरी प्रदानास विलंब केल्याबद्दल नुकसान भरपाई**

| अनु.क्र. | तपशील | देय नुकसान भरपाई (₹ लाखात) |
|---|---|---|
| 1 | गणन केलेली नुकसान भरपाई | 829.64 |
| 2 | मंजूर नुकसान भरपाई | 225.49 |
| 3 | अद्याप पडताळणी करावयाची नुकसान भरपाई | 16.27 |
| 4 | नाकारलेली नुकसान भरपाई (अ.क्र.1-2-3) | 587.88 |
| 5 | मंजूर रकमेतून देण्यात आलेली नुकसान भरपाई | 212.03 |
| 6 | थकीत नुकसान भरपाई (क्र. 2-5) | 13.46 |

***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाऊनलोड केलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित***

या संदर्भात लेखापरीक्षणात खालील गोष्टी आढळून आल्या.

- **तक्ता 4.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 225.49 लाखांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली होती, त्यापैकी ₹ 212.03 लाख प्रदान करण्यात आले होते, तर ₹ 13.46 लाख प्रदान करणे बाकी होते. उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (जून 2025) की, ₹ 13.46 लाख थकित रकमेची पडताळणी करण्यात येत असून ती अदा केली जाईल. सप्टेंबर 2025 पर्यंत ₹ 13.96 लाख भरपाई प्रदाने थकीत होती.
- ₹ 587.88 लाख रक्कम (निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील ₹ 182.54 लाख सह) संयुक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नाकारली. नाकारण्यासाठी नरेगासॉफ्टमध्ये नोंदविण्यात आलेली दोन कारणे (i) नैसर्गिक आपत्ती (19.59 लाख मनुष्यदिवस) आणि (ii) अदेय नुकसान भरपाई (825.61 लाख मनुष्यदिवस) ही होती. मात्र, नरेगासॉफ्टमध्ये नमूद केलेल्या कारणांची सत्यता तपासण्यासाठी कोणतेही लेखापरीक्षण माग नव्हते.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद केले (मार्च 2025) की, मुख्य परिपत्रकातील परिच्छेद 9.8.3 मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान भरपाई न देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तर निधी उपलब्ध नसल्याने इतर नुकसानभरपाई नाकारली जाते त्यामुळे नुकसान भरपाई न देण्याचा पर्याय कार्यक्रम अधिकारी स्तरावर निवडला जातो. तथापि, विलंब नुकसान भरपाई नाकारलेल्या विशिष्ट प्रकरणांची नोंद ठेवण्याच्या सूचना सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांना दिल्या जातील. भारत सरकारच्या मुख्य परिपत्रकामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान भरपाई न देण्यास मान्यता देण्यात आली आहे आणि निधी उपलब्ध नसल्यामुळे इतर नुकसानभरपाई

नाकारली जाते, हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण परिपत्रकाद्वारे जारी केलेल्या कोणत्याही निर्देशांपेक्षा महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमधील तरतुदींना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे कोणत्याही कारणास्तव नुकसान भरपाई नाकारण्यात आली असली तरी शासनाकडून मजुरी देण्यास विलंब होत असल्याने मजुरांना त्यांची कायदेशीर थकबाकी म्हणून नुकसानभरपाई देय होती.

- नुकसान भरपाई नाकारल्यावर मजुरांना नुकसान भरपाई दिली जात नाही. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही ज्याच्या आधारे मजुरांना देय नुकसान भरपाई नाकारली जाऊ शकते. त्यामुळे कोणत्याही कारणास्तव नुकसान भरपाई नाकारण्यात आली असली तरी शासनाकडून मजुरी देण्यास विलंब होत असल्याने मजुरांना त्यांची कायदेशीर थकबाकी म्हणून नुकसानभरपाई देय होती.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (जून 2025) केले की, पदाधिकारी/कर्मचाऱ्यांमुळे विलंब झाला तरच विलंबाने नुकसान भरपाई दिली जाते आणि पदाधिकारी जबाबदार नसल्यास विलंबाने नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. उत्तर स्वीकारार्ह नाही कारण मजुरी देण्यास विलंब झाल्यास मजुरी मागणाऱ्याला नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार आहे आणि विलंबास पदाधिकारी जबाबदार नसल्यास नुकसान भरपाई न देण्याची कोणतीही तरतूद महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्यामध्ये नाही. सप्टेंबर 2025 पर्यंत, नाकारण्यात आलेली भरपाई ₹ 616.05 लाख इतकी होती.

- महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुसूची III च्या कलम 29 (1) (डी) नुसार देयकासाठी मंजूर केलेली नुकसान भरपाई पदाधिकाऱ्यांकडून वसूल करणे आवश्यक होते. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023- 24 दरम्यान प्रदान करण्यात आलेल्या ₹ 2.12 कोटी नुकसान भरपाईपैकी ₹ 0.69 कोटी पदाधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात आले, तर मे 2024 पर्यंत ₹ 1.43 कोटींची वसुली प्रलंबित होती. उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (जून 2025) केले की, जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वसूल करावयाच्या रकमेची पडताळणी करून ₹ 1.43 कोटींची वसुली केली जाईल.

- **तक्ता 4.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 16.27 लाख[11] नुकसानभरपाईची पडताळणी प्रलंबित होती. त्यामुळे, भारत सरकारने जारी केलेल्या मुख्य परिपत्रकानुसार, कार्यक्रम अधिकाऱ्याने नुकसान भरपाई देय झाल्यापासून 15 दिवसांच्या आत निकाली काढली जाण्याची सुनिश्चिती करणे आवश्यक असताना एक ते चार वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही कामगारांची वैध देय वितरित करण्यात आले नाही. उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी

[11] 2019-20: ₹ 0.99 लाख; 2020-21: ₹ 2.46 लाख; 2021-22: ₹ 2.85 लाख, 2022-23: ₹ 0.83 लाख; 2023-24: ₹ 9.14 लाख

योजना) नमूद (जून 2025) केले की, रकमेची पडताळणी करून ती मंजूर करण्यात येईल. सप्टेंबर 2025 पर्यंत, पडताळणीसाठी प्रलंबित नुकसान भरपाई ₹ 30.07 लाख होती.

- महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायद्याच्या अनुसूची III च्या परिच्छेद 29 नुसार नुकसानभरपाई देय झाल्यापासून ती अदा करण्यास पंधरा दिवसांच्या कालावधीपेक्षा अधिक विलंब झाल्यास नुकसान भरपाई देय होती. अशा नुकसानभरपाईची मोजणी करण्याची तरतूद नरेगासॉफ्टकडे नव्हती किंवा अशी नुकसानभरपाई देण्यास विलंब झाल्यास देय रकमेचा विचार राज्य शासनाने केलेला नाही, असे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (जून 2025) केले की, नरेगासॉफ्टमध्ये तरतूद करण्याची विनंती ग्रामीण विकास मंत्रालयाला केली जाईल.

## 4.11 मजुरीचे दायित्व

नरेगासॉफ्टमध्ये उपलब्ध माहितीनुसार, **तक्ता 4.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान अकुशल मजुरीच्या प्रदानापोटी ₹ 35.32 कोटी इतकी रक्कम थकीत होती.

**तक्ता 4.4: राज्यातील मजुरीचे प्रलंबित दायित्व**

| वर्ष | अकुशल मजुरी (₹ कोटीत) |
|---|---|
| 2019-20 | 2.39 |
| 2020-21 | 2.71 |
| 2021-22 | 6.29 |
| 2022-23 | 7.04 |
| 2023-24 | 16.89 |
| **एकूण** | **35.32** |

***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाउनलोड केलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित***

**तक्ता 4.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान ₹ 35.32 कोटी ऑक्टोबर 2024 पर्यंत थकीत होते, त्यापैकी ₹ 18.43 कोटी एक ते चार वर्षांच्या कालावधीसाठी थकीत होते. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये 2019-20 ते 2023-24 दरम्यान ₹ 4.04 कोटी थकीत होते. तसेच, चाचणी-तपासणी केलेल्या 336 कामांपैकी 49 कामांमध्ये 510 कामगारांना ₹ 7.09 लाख मजुरी प्रदान करण्यात आली नव्हती.

अकुशल कामगारांच्या थकीत मजुरीची जिल्हा-निहाय स्थिती **परिशिष्ट 4.1** मध्ये दर्शविली आहे**.** परिशिष्टामध्ये दर्शविल्याप्रमाणे बीड जिल्ह्यात सर्वाधिक ₹ 14.81 कोटी थकीत मजुरी होती. मजुरीचे प्रदान न केल्याने ग्रामीण भारतात राहणाऱ्या दुर्बल लोकांना सामाजिक संरक्षण देण्याचे योजनेचे अंतिम उद्दिष्ट विफल ठरते.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (मार्च 2025) केले की, शक्य तितक्या लवकर प्रदान केले जाईल.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023-24, या कालावधीसाठी दायित्व ऑक्टोबर 2024 मधील ₹ 35.32 कोटी वरून सप्टेंबर 2025 पर्यंत ₹ 14.04 कोटी पर्यंत कमी झाली. त्यापैकी ₹ 13.12 कोटी परिच्छेद 4.12 मध्ये चर्चिल्याप्रमाणे नाकारलेले व्यवहार आणि बँक प्रतिसाद प्रलंबित असल्यामुळे प्रलंबित होते.

## 4.12 सक्रीय कामगारांचे आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्यासोबत न जोडणे

या योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरणाद्वारे मजुरांचे पैसे मजुरांच्या खात्यात जमा केले जातात. पण आधार आधारित प्रदाने करण्यासाठी बँकांनी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या नकाशकावर (मॅपर) आधार जोडणी (सीडिंग) आणि त्याचे नकाशन करणे आवश्यक आहे.

ग्रामीण विकास मंत्रालयाने वेळोवेळी जारी केलेल्या मुख्य परिपत्रकानुसार आधार आधारित प्रदानांसाठी खालील थेट लाभ हस्तांतरण धोरण अवलंबले जाणार होते.

- नरेगासॉफ्टमधील सर्व सक्रिय कामगारांसाठी सर्व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कामगारांची आधार अंतर्गत नोंदणी आणि बँक खात्याशी आधार क्रमांक जोडणे आवश्यक आहे.
- कार्यक्रम अधिकाऱ्याद्वारे विशिष्ट ओळख (युआयडी) माहिती हाताळून तपासणी दरम्यान जनसांख्यिकीय प्रमाणीकरणात अपयशी ठरलेल्या सर्व आधार क्रमांकांची प्रत्यक्ष पडताळणी करणे.
- सर्व सक्रिय कामगारांच्या खात्यांची पडताळणी व पुष्टीकरण त्यांना संबंधित बँकेत पाठवून करणे.
- बँक खात्यांमध्ये सत्यापित आधार क्रमांक जोडणे आणि आधार आधारित प्रदानांसाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या नकाशकावर ठेवणे.

नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासनाने जानेवारी 2023 मध्ये जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे सक्रिय जॉब कार्डच्या 100 टक्के आधार जोडणीवर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली होती.

निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबर 2024 पर्यंत केलेल्या आधार जोडणीची स्थिती **तक्ता 4.5** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.5: ऑक्टोबर 2024 पर्यंत राज्य आणि निवडलेल्या जिल्ह्यांमधील सक्रिय कामगारांची आधार जोडणी आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या नकाशनाची स्थिती**

| निवडलेल्या जिल्ह्याचे नाव | सक्रिय कामगारांची एकूण संख्या | सक्रीय कामगारांची आधार जोडणी पूर्ण | आधार जोडणी पूर्ण झाल्याची टक्केवारी | भारतीय विशिष्ट ओळख प्रमाणीकरण सत्यापन पूर्ण | नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे नकाशन पूर्ण | नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या नकाशनाची टक्केवारी पूर्ण |
|---|---|---|---|---|---|---|
| अहिल्यानगर | 2,59,614 | 2,58,415 | 99.54 | 2,57,206 | 2,41,669 | 93.09 |
| अमरावती | 3,73,837 | 3,66,687 | 98.09 | 3,60,497 | 3,42,407 | 91.59 |
| छत्रपती संभाजीनगर | 4,44,336 | 4,36,588 | 98.26 | 4,24,331 | 4,08,649 | 91.97 |
| धाराशिव | 1,31,275 | 1,26,498 | 96.36 | 1,21,911 | 1,14,357 | 87.11 |
| नागपूर | 1,65,406 | 1,65,092 | 99.81 | 1,63,637 | 1,52,394 | 92.13 |
| पालघर | 2,47,783 | 2,46,842 | 99.62 | 2,40,987 | 2,24,733 | 90.70 |
| **एकूण** | **16,22,251** | **16,00,122** | **98.64** | **15,68,569** | **14,84,209** | **91.49** |
| **राज्याची एकंदर स्थिती** | **72,73,401** | **71,58,175** | **98.42** | **70,37,337** | **66,65,348** | **91.64** |

***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाऊनलोड केलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित***

**तक्ता 4.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यातील 98.42 टक्के सक्रिय मजुरांचे आधार क्रमांक व बँक खाते यांची जोडणी पूर्ण झाली आहे. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये आधार क्रमांक व बँक खाते जोडणीचे प्रमाण 96.36 टक्के ते 99.81 टक्के इतके आहे.

राज्यात 91.64 टक्के सक्रिय कामगारांचे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे नकाशन पूर्ण झाले होते. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे नकाशन 87.11 टक्के ते 93.09 टक्के आहे.

उत्तरात, आयुक्तांनी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) नमूद (मार्च 2025) केले की, सर्व सक्रिय कामगारांचे 100 टक्के आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे नकाशन यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की सप्टेंबर 2025 पर्यंत राज्यातील 99.33 टक्के सक्रिय कामगारांचे आधार क्रमांक जोडणी पूर्ण झाली होती, तर 96.43 टक्के सक्रिय कामगारांचे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे नकाशन पूर्ण झाले होते.

आधार आधारित प्रदानांसाठी आधार जोडणीमध्ये राज्य शासनाने भरीव प्रगती केली असली, तरी **तक्ता 4.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मजुरी प्रदानासाठी मोठ्या संख्येने नाकारलेले व्यवहार राज्यात प्रलंबित होते.

**तक्ता 4.6 : ऑक्टोबर 2024 पर्यंत प्रलंबित मजुरी वितरण**

| वर्ष | वितरण प्रलंबित असलेली मजूरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुनरुज्जीवन प्रलंबित असलेल्या नाकारलेल्या व्यवहारांची संख्या | पुनरुज्जीवन प्रलंबित व्यवहारांमध्ये गुंतलेली रक्कम (₹ लाखांमध्ये) | बँकेचा प्रतिसाद प्रलंबित असलेल्या नाकारलेल्या व्यवहारांची संख्या | नाकारलेल्या व्यवहारांमध्ये गुंतलेली रक्कम (₹ लाखांमध्ये) | नाकारलेल्या व्यवहारांची एकूण संख्या | गुंतलेली रक्कम (₹ लाखांमध्ये) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 2019-20 | 0 | 0 | 19,766 | 232.39 | 19,766 | 232.39 |
| 2020-21 | 13 | 0.21 | 16,641 | 223.55 | 16,654 | 223.76 |
| 2021-22 | 128 | 1.82 | 40,858 | 580.43 | 40,986 | 582.25 |
| 2022-23 | 197 | 2.61 | 44,675 | 666.27 | 44,872 | 668.88 |
| 2023-24 | 2,014 | 29.55 | 1,26,245 | 1,930.96 | 1,28,259 | 1,960.51 |
| **एकूण** | **2,352** | **34.19** | **2,48,185** | **3,633.60** | **2,50,537** | **3,667.79** |

*स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून डाऊनलोड केलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित*

**तक्ता 4.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 36.68 कोटी मजुरी प्रदान करावयाचे 2.51 लाख व्यवहार हे चुकीचे खाते क्रमांक, बंद खाते, अवरोधित किंवा गोठवलेले खाते, आधार क्रमांक निष्क्रिय करणे आदी कारणांमुळे फेटाळण्यात आले होते. ₹ 36.68 कोटींपैकी ₹ 17.07 कोटी एक वर्ष ते चार वर्षांपासून प्रलंबित होते. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये ₹ 4.93 कोटी मजुरी अंतर्भूत असलेले 35,340 व्यवहार फेटाळण्यात आले. या नाकारण्यात आलेल्या व्यवहारांवरील वितरण एकतर पुनरुज्जीवनासाठी[12] (निधी हस्तांतरण आदेश तयार करणे) प्रलंबित होते किंवा पुनरुज्जीवित केले गेले असले तरी बँकेच्या प्रतिसादासाठी[13] प्रलंबित होते.

उत्तरात, सहाय्यक संचालक (लेखा) (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद (जून 2024) केले की, तांत्रिक व इतर कारणांमुळे म्हणजेच लाभार्थ्यांचा चुकीचा खाते क्रमांक आदी कारणांमुळे बँकांनी व्यवहार नाकारले. शिवाय, 2023-24 मध्ये भारत सरकारकडून अधूनमधून निधी मुक्त करण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यवहार नाकारले गेले. तथापि, व्यवहारांना नकार कमी करण्यासाठी नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन यांनी (ऑगस्ट 2021) मानक कार्यचालन पद्धती जारी केली आणि जानेवारी 2023 मध्ये जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे नाकारलेल्या व्यवहारांबाबत प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की सप्टेंबर 2025 पर्यंत 2019-20 ते 2023- 24 या कालावधीसाठी एकूण प्रलंबित नाकारलेले व्यवहार 87,679 पर्यन्त कमी होऊन त्यात ₹ 13.12 कोटी समाविष्ट होते.

---

12 पुनरुज्जीवित म्हणजे निधी हस्तांतरण आदेश तयार करणे.

13 प्रलंबित बँक प्रतिसाद म्हणजे व्यवहाराच्या यश किंवा अपयशाची पोचपावती बँकांकडून प्रतीक्षेत आहे.

## 4.13 हजेरीपट

या योजनेंतर्गत मजुरांची उपस्थिती हजेरीपटावर घेतली जाते. प्रत्येक हजेरीपटामध्ये कामासाठी अर्ज केलेल्या मजुरांच्या यादीसह नरेगासॉफ्टने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तयार केलेला एक विशिष्ट ओळख क्रमांक असतो. ग्राम रोजगार सहाय्यकातर्फे दररोज हजेरी नोंदवून कामाच्या ठिकाणी हजेरीपट राखले जातात. कामगाराला देय असलेली दर दिवसाची मजुरी तांत्रिक सहाय्यकाद्वारे मापन पुस्तिकेतील कामाच्या मूल्यावर (कामाचे प्रमाण आणि राज्याच्या दरपत्रकानुसार दर विचारात घेऊन कामाचे मूल्य निश्चित केले गेले होते) आणि कामाच्या अंमलबजावणीसाठी वापरल्या गेलेल्या व्यक्तीदिवसांवर आधारित ठरवले जाते. मोजमाप पुस्तिकेत नोंद असलेल्या कामगाराला देय असलेली रोजची मजुरीही हजेरीपटामध्ये नोंदवली जाते. हजेरीपट बंद झाल्यानंतर, दर आठवड्याच्या शेवटी, मजुर हजेरीपटावर स्वाक्षरी करतात आणि नंतर नरेगासॉफ्टमधील इलेक्ट्रॉनिक हजेरीपटामध्ये उपस्थिती आणि मजुरी दर प्रविष्ट करण्यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. जानेवारी 2023 पासून वैयक्तिक लाभार्थी योजना/प्रकल्प वगळता इतर सर्व कामांच्या संदर्भात एका दिवसात कामांचे दोन समय शिक्के (टाईम स्टॅम्प) आणि भू-स्थानिक जोडणी(जिओ- टॅग) केलेली छायाचित्रे असलेल्या मोबाइल उपयोजनाद्वारे (नॅशनल मोबाइल मॉनिटरिंग सिस्टीम) कामाच्या ठिकाणी उपस्थिती नोंदविण्यास सुरुवात झाली.

### 4.13.1 हजेरीपट/मोजमाप पुस्तिका यामधील विसंगती

निवडलेल्या 336 कामांच्या संदर्भातील हजेरीपट/मोजमाप पुस्तकांची छाननी केली असता विविध विसंगती आढळून आल्या.

- नऊ हजेरीपटांमध्ये (जिल्हा: छत्रपती संभाजीनगर, ग्राम पंचायत: गेवराई कुबेर) 11 कामगारांची 66 दिवसांची उपस्थिती हजर वरुन गैरहजर करण्यात आली होती किंवा कोणत्याही कारणाशिवाय ग्राम रोजगार सेवकाची नोंद व स्वाक्षरी न घेता रद्द करण्यात आली होती.
- सात हजेरीपटांमध्ये (जिल्हा: अमरावती, ग्राम पंचायत:.इतकी शिवार (बु); जिल्हा: छत्रपती संभाजीनगर, ग्राम पंचायती: गेवराई कुबेर) 199 मनुष्यदिवस नोंदविण्यात आले असताना इलेक्ट्रॉनिक हजेरी पटामध्ये 143 मनुष्यदिवसांची नोंद करण्यात आल्याने 32 कामगारांना ₹ 14,221 मजुरी कमी देण्यात आली. त्याचप्रमाणे 16 हजेरीपटांमध्ये (जिल्हा: अमरावती, ग्राम पंचायत.इतकी शिवार(बु, हिंगणी, मिर्झापूर) मानवी/हस्तलिखित हजेरीपटामध्ये नोंद असलेले 508 मनुष्यदिवस इलेक्ट्रॉनिक हजेरीपटामध्ये 574 मनुष्यदिवस म्हणून नोंदविण्यात आल्याने 102 कामगारांना ₹ 15,807 चे अतिरिक्त प्रदान करण्यात आले.
- एका हजेरीपटामध्ये (जिल्हा: छत्रपती संभाजीनगर, ग्राम पंचायती: गेवराई कुबेर) हजेरीपटानुसार एक कामगार गैरहजर असला तरी तो इलेक्ट्रॉनिक हजेरी

पटामध्ये हजर म्हणून समाविष्ट करण्यात आला होता आणि जून 2023 मध्ये ₹ 1,638 चे त्यास मजुरी प्रदान करण्यात आले होते.

- चार हजेरीपटावरील 156 मनुष्यदिवसांऐवजी, 186 मनुष्यदिवसांचा विचार करून कामगारांना देय असलेली रोजची मजुरी मोजमाप पुस्तिकेमध्ये गणन करण्यात आली, परिणामी 17 कामगारांना ₹ 8,112 इतकी कमी मजुरी देण्यात आली.

वरील विसंगतींमुळे मजुरांना मजुरी वितरणासाठी असलेल्या इलेक्ट्रॉनिक हजेरीपटामध्ये अचूक उपस्थिती नमूद करणे आणि मजुरी दराची योग्य नोंद घेणे यासाठी विभागात पुरेसे अंतर्गत नियंत्रण नसल्याचे दिसून आले.

निर्गमन बैठकीमध्ये आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी अंतर्गत नियंत्रण बळकट करण्यासाठी आढावा घेऊन कार्यवाही करण्याचे मान्य केले.

### 4.13.2 काम पूर्ण झाल्यानंतर हजेरीपट निर्मिती

निवडलेल्या 336 कामांमध्ये समाविष्ट असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामांच्या 67 हजेरीपटांचे लेखापरीक्षणाने तपासणी केली. याव्यतिरिक्त, लेखापरीक्षणाने निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींमधील 441 प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामांच्या (यादृच्छिक आधारावर निवडलेल्या) हजेरीपटांची देखील छाननी केली. प्रधानमंत्री आवास योजनेच्या 508 कामांची लेखापरीक्षणात छाननी करण्यात आली. नरेगासॉफ्ट आणि आवाससॉफ्ट पोर्टलमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामासाठी समान कार्य कोड दिला जातो. आवाससॉफ्ट पोर्टलवरील काम पूर्ण झाल्याच्या तारखेची तपासणी केली गेली आणि समान कार्य संहिता असलेल्या या 508 प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामांच्या संदर्भात नरेगासॉफ्टमध्ये हजेरीपट तयार करण्याच्या तारखांशी तुलना केली गेली. तुलनेतून असे निदर्शनास आले की, 508 कामांपैकी 389 कामांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत काम पूर्ण झाल्याच्या तारखेनंतर हजेरीपट तयार करण्यात आल्याचे या आहे. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत या 389 कामांसाठी ₹ 51.82 लाख इतका देय रकमेचा खरेपणा संशयास्पद होता.

उत्तरात, आयुक्त (मनरेगा) (जून 2025) म्हणाले की, काम पूर्ण होण्याच्या तारखेपूर्वी किंवा काटेकोरपणे हजेरीपट वेळेवर तयार आणि सत्यापित केले जातील याची खात्री करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

### निष्कर्ष

निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 47 ग्राम पंचायतींमध्ये, जॉब कार्डसाठी अर्ज नोंदवही एकतर ठेवली गेली नाही किंवा अद्ययावत केली गेली नाही. नोंदणीकृत सदस्यांची छायाचित्रे नसणे आणि कामाच्या मागणीचा तपशील नोंदविण्यात अयशस्वी होणे यासह जॉब कार्ड देखभालीतील त्रुटी आढळल्या. याव्यतिरिक्त, निवडलेल्या ग्राम पंचायतीमधील नोंदणीकृत कुटुंबांपैकी, 91 टक्के नोंदणीकृत कुटुंबांना जानेवारी 2025 पर्यंत जॉब कार्डस

देण्यात आली आणि 2019-20 आणि 2023-24 दरम्यान 52 टक्के नोंदणीकृत कुटुंबांना जॉब कार्डस देण्यास विलंब झाला. शिवाय, अशा विसंगती टाळण्यासाठी नरेगासॉफ्ट प्रणालीमध्ये तपासणीचा अभाव असल्यामुळे निवडलेल्या 44 ग्राम पंचायतींमध्ये दुबार जॉब कार्डस जारी केल्याची उदाहरणे निदर्शनास आली.

महिला, वृद्ध, अपंग आणि दुर्बल आजार असलेल्या लोकांसाठी स्वतंत्र दरपत्रक राज्य शासनाने तयार केले नव्हते. काळ, काम आणि वेगाच्या अभ्यासावर आधारित तयार केलेल्या दरांचे वेळापत्रक राज्य शासनाकडे मंजूर होणे बाकी होते.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत सरासरी सात टक्के मजुरी विलंबाने दिली गेली. ₹ 5.88 कोटी नुकसान भरपाईचे दावे संयुक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्ती आणि अस्वीकारार्हता यांचे कारण देऊन नाकारले, जरी महाराष्ट्र रोजगार हमी कायद्यात नाकारण्याची अशी कोणतीही तरतूद नव्हती. तसेच, नुकसान भरपाईचे वितरण करण्यास विलंब झाल्यास देखील नुकसान भरपाई देय होती; मात्र अशा भरपाईची गणना करण्यासाठी नरेगासॉफ्टमध्ये कार्यात्मकता नवती किंवा राज्य शासनाने देय रकमेचे मूल्यांकन करून देय रक्कम मुक्त केली नव्हती. याव्यतिरिक्त, ऑक्टोबर 2024 पर्यंत ₹ 35.32 कोटी मजुरी देण्यात आली नव्हती, जी वेळेवर मजुरी आणि नुकसान भरपाईच्या वितरणातील पद्धतशीर कमतरता दर्शवते.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अभिसरण कामांच्या लेखापरीक्षण छाननीत असे निदर्शनास आले की प्रधानमंत्री आवास योजनेची कामे पूर्ण होण्याच्या नोंदलेल्या तारखेनंतरही निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींमध्ये हजेरी पटाची अनियमित निर्मिती झाली आहे. हे हजेरीपट निर्मितीतील कमकुवत संनियंत्रण दर्शविते.

**शिफारशी**

***शिफारस क्र. 3: शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात नमूद केलेल्या विहित कालावधीत जॉबकार्डस देण्याचे निर्देश सर्व ग्राम पंचायतींना द्यावे तसेच नोंदणीकृत दुबार जॉबकार्डस वगळण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी.***

***शिफारस क्र. 4: शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमातील तरतुदींनुसार बेरोजगारी भत्ता व मजुरी देण्यास विलंब झाल्यास नुकसान भरपाई देण्याची सुनिश्चिती करावी.***

***शिफारस क्र. 5: शासनाने संनियंत्रण बळकट करावे आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कामांच्या पूर्ण होण्याच्या तारखेनंतर हजेरीपट तयार करणे रोखण्यासाठी योग्य यंत्रणा तयार करावी.***